महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

WWW.DAILYAWAZ.COM

RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष – १२ वे ■ अंक क्र. – ११० ■ गुरूवार दि.१३ नोव्हेंबर २०२५ ■ किंमत – १ रूपया ■ पाने – ४

✲ उत्सुकता ✲




# साईबाबा संस्थानने कथित चमत्काराला थारा देऊ नये – अंनिसचे आवाहन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**कोळपेवाडी प्रतिनिधी :–** शिर्डी येथील साईबाबा मंदिर परीसरातील द्वारकामाईमध्ये साईंबाबांच्या धुनीच्या सानिध्यात एक दृष्टीहीन मुलाला दृष्टी मिळाल्याचा चमत्कार झाल्याची चर्चा आहे. या कथित चमत्कारास संस्थानने पाठीशी घालु नये, असे आवाहन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्यवाह कृष्णा चांदगुडे यांनी केले आहे.

अधिक माहिती अशी की, उत्तराखंड येथुन आलेल्या अंकुश सेन या अल्पवयीन मुलाने आईसोबत साईदर्शन घेतले. सदर मुलगा एका डोळ्याने अंध होता, असे सांगितले गेले. परंतु द्वारकामाई येथे दर्शनाने त्याला दृष्टी मिळाली. भक्तांनी हा कथित चमत्कार पाहून सोशल मिडीया व प्रसार माध्यमात पसरवला.

महाराष्ट्र अंनिस या कथित चमत्काराचे सत्यशोधन करु इच्छिते. संस्थानचा या कथित चमत्कारास पाठिंबा असल्यास आपले प्रशस्त नेत्ररुग्णालय बंद करुन अंध व्यक्तींना चमत्काराच्या माध्यमातुन दृष्टी प्रदान करण्यासाठी प्रयत्न करावे. सत्यशोधनासाठी आम्ही साईबांबाचे भक्त असलेले पाच नेत्रहीन व्यक्ती पुरवतो. त्यास चमत्काराने दृष्टी आल्यास आम्ही जनतेतुन गोळा केलेले एकवीस लाखाचे बक्षीस देऊ व आमची चळवळ बंद करु.याबाबत संस्थानने खंबीर भुमिका घेऊन आपले भत जाहिर करावे.

खरे तर मागिल वर्षांपासून साईबाबा संस्थानच्या रुग्णालयात नेत्रदान मोहिम सुरु झालेली आहे.अंधव्यक्तींना दृष्टी प्रदान करण्याचे मानवतावादी कार्य केले जाते. हे निश्चितच अभिनंदनीय आहे.आम्ही सुध्दा या मोहिमेचा प्रचार–प्रसार करतो. त्यामुळे एका बाजुने विज्ञान तर दुसर्या बाजुने कथित चमत्कार अशी विसंगत भुमिका संस्थानने घेऊ नये, अशी अंनिसने विनंती केली आहे.

अंनिसने या अगोदर साईबाबांचे नाव घेत भोंदुबाबरी करणाऱ्यांची भोंदुगिरी बंद करुन साईसंस्थानला अधिक उन्नत केले आहे व काही कथित चमत्काराची पोलखोल केलेली आहे.साईबाबांची भक्तांतील स्थान अबाधित राहण्यास मदत केली आहे.त्यामुळे साईबाबा संस्थानने पत्रक काढून या चमत्कारास पाठिंबा न देण्याची भुमिका घ्यावी, असे आवाहन महाराष्ट्र अंनिसचे राज्य कार्यवाह, कृष्णा चांदगुडे यांनी केला आहे.

**आमचा विरोध साईबाबांवरील श्रद्धेला नसुन त्यांच्या नावाखाली वारंवार होणाऱ्या कथित चमत्कारास आहे. असे अनेक प्रकार समितीने हाणून पाडले आहे. त्यामुळे आतातरी संस्थानने सत्याची बाजू घेत आपली भुमिका जाहिर करावी**

**–कृष्णा चांदगुडे,**
**राज्य कार्यवाह, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती**



**दै. आवाज वृत्तसेवा...**

'मी बेलदारवाडी शाळेत १ वर्षांपूर्वी हजर झालो. तेव्हा मला सविता कैलास मोरे हि बेलदारवाडी शाळेतील माजी विद्यार्थिनी व जन्मतः च दिव्यांग व वयाची १४ वर्षे पूर्ण झालेली परंतु आधार कार्ड नसल्याने कोणताही लाभ नाही,असे दिसले.मग तिची आधार कार्ड काढलेली जुनी पावती शोधली. पण मोबाईल नंबर तो उपलब्ध नसल्याने व तांत्रिक अडचणींमुळे आधार कार्ड निघत नव्हते.मग मुंबईतील कुलाब्याच्या आधारचे मुख्य कार्यालय येथे तपास व पाठपुरावा सुरू केला. ७–८ महिने नंतर शेवटी आज आधार कार्ड मिळाले.यासाठी जो खर्च लागला..–त्या खर्चातील एक भाग पत्रकार भगवान सोनवणे, एक भाग मी व एक भाग तिचे वडील यांनी उपलब्ध करून दिला. तांत्रिक मदत राहुल आहेर यांनी केली.आता तयारी दिव्याग प्रमाणपत्राची..'

**– एक शिक्षक..**

# राष्ट्रीय जल पुरस्कारांमध्ये महाराष्ट्र सर्वोत्कृष्ट राज्य; नवी मुंबई महापालिका स्थानिक स्वराज्य संस्था गटात प्रथम




**दै. आवाज वृत्तसेवा...**


नवी दिल्ली : केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाच्या जलसंसाधन, नदीविकास आणि गंगा संरक्षण विभागातर्फे जलसंरक्षण आणि जलव्यवस्थापनातील उत्कृष्ट कामगिरीला प्रोत्साहन देण्यासाठी देण्यात येणारे सहावे राष्ट्रीय जल पुरस्कार (२०२४) जाहीर करण्यात आले. सर्वोत्कृष्ट राज्य श्रेणीत महाराष्ट्राने प्रथम क्रमांक मिळवला असून, गुजरात दुसऱ्या तर हरियाणा तिसऱ्या क्रमांकावर आहे. स्थानिक स्वराज्य संस्था गटात नवी मुंबई महापालिकेने प्रथम पुरस्कार तर पाणी वापर संस्थामध्ये नाशिक जिल्ह्यातील कानिफनाथ संस्थेने द्वितीय क्रमांक पटकावला आहे.

जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी या पुरस्कारांची घोषणा केली. पुरस्कार वितरण येत्या १८ नोव्हेंबरला नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत होणार आहे. (पान ४ वर)

# बिबट्याला ठार मारण्याच्या मागणीसाठी देवगावकर आक्रमक, रास्ता रोको आंदोलन








**दै. आवाज वृत्तसेवा...**

निफाड तालुक्यातील देवगाव परिसरात गेल्या काही दिवसांपासून दहशत निर्माण करणाऱ्या एका बिबट्याला अखेर वनविभागाच्या पथकाने लावलेल्या पिंजऱ्यात जेरबंद करण्यात यश मिळवले. मात्र, बिबट्या पकडल्यानंतर संतप्त झालेल्या शेतकरी, ग्रामस्थ आणि शाळकरी मुलांनी अत्यंत आक्रमक भूमिका घेत, या 'नरभक्षक' बिबट्याला ठार मारल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नाही, असा पवित्रा घेऊन मुख्य रस्त्यावर तब्बल १२ तास रास्ता रोको आंदोलन केले.

बिबट्याच्या दहशतीने नागरिक त्रस्त गेल्या काही महिन्यांपासून देवगाव आणि आसपासच्या परिसरात बिबट्याचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला होता. या बिबट्याने अनेक पाळीव जनावरांवर हल्ले करून त्यांना ठार केले होते. तसेच, शेतीत काम करणाऱ्या मजुरांमध्ये आणि शाळेत जाणाऱ्या लहान मुलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. यामुळे त्रस्त झालेल्या ग्रामस्थांनी वनविभागाकडे बिबट्याला पकडण्याची वारंवार मागणी केली होती. अखेरीस, वनविभागाच्या पथकाला आज पहाटेच्या सुमारास एका शेतात लावलेल्या पिंजऱ्यात बिबट्या अडकलेला आढळला.

**शेतकऱ्यांची आक्रमक भूमिका: 'ठार' करण्याची मागणी**


बिबट्या पकडला गेल्याची बातमी गावात पसरताच, वनविभागाचे पथक त्याला घेऊन जाण्यासाठी आले. तेव्हा संतप्त शेतकरी आणि शाळकरी मुलांनी त्यांना घेराव घातला. आंदोलकांनी मागणी केली की, बिबट्याला नुसते पकडून दुसरीकडे सोडल्यास तो पुन्हा याच भागात येईल आणि निष्पाप लोक व गुरांचा बळी घेईल. जोपर्यंत या बिबट्याला ठार केले जात नाही, तोपर्यंत आम्ही रास्ता रोको मागे घेणार नाही.

शेतकरी आणि शाळकरी मुलांनी रस्त्यावर ठिय्या मांडल्यामुळे परिसरातील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आणि प्रशासनाची मोठी कोंडी झाली. बिबट्याच्या भीतीने शाळकरी मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला होता, त्यामुळे त्यांचाही या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभाग होता.

प्रशासनाची धावपळ आणि चर्चा या तीव्र मागणीमुळे वनविभाग आणि पोलीस प्रशासनाची मोठी धावपळ उडाली. बिबट्याला ठार मारणे हे कायद्याच्या चौकटीत बसत नसल्याचे तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय असा निर्णय घेता येत नसल्याचे वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी आंदोलकांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. पंडित मुदगुल यांच्या मध्यस्थीने आंदोलनाची यशस्वी सांगता

तणावपूर्ण शांततेच्या वातावरणात तब्बल १२ तास रास्ता रोको सुरू होता. अखेरीस, सामाजिक कार्यकर्ते पंडित मुदगुल यांच्या मध्यस्थीने आंदोलकांनी आपली भूमिका बदलली. प्रशासनाने आंदोलकांच्या मागणीनुसार, थर्मल ड्रोन वापरून परिसरात अजून बिबटे आहेत का, याचा शोध घेण्याचे आणि पकडलेल्या बिबट्यांची नसबंदी करून त्याला वन तारा संस्थेकडे सुपूर्द करण्याचे आश्वासन दिले. या आश्वासनानंतर, पंडित मुदगुल यांच्या मध्यस्थीने आंदोलन मागे घेण्यात आले आणि पकडलेल्या बिबट्याला वन विभागाकडे सुपूर्द करण्यात आले. प्रशासनाने दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली असून, सध्या देवगाव परिसरात शांतता आहे.


****



# नाशिक पोलिसांची यशस्वी कारवाई: बनावट टाटा मोटर्स डीईएफ युरिया बकेट्स आणि पॅकिंग साहित्य जप्त







**दै. आवाज वृत्तसेवा...**
टाटा मोटर्सच्या अधिकृत टीमकडून दाखल करण्यात आलेल्या तक्रारीच्या आधारे नाशिक पोलिसांनी पिंपळगाव परिसरात धाड टाकली. नाशिक जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक श्री. बालासाहेब पाटील यांच्या आदेशानुसार पिंपळगाव पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली.

या धाडीत पोलिसांनी बनावट टाटा मोटर्स डीईएफ युरिया बकेट्स आणि पॅकिंग साहित्य जप्त केले.
श्री शैनेश्वर एंटरप्रायझेसचे मालक करण आणि निसार रफिक इनामदार (वय ३०) यांना बनावट टाटा मोटर्स डीईएफ युरिया बकेट्स विक्री केल्याच्या आरोपावरून अटक करण्यात आली आहे.

या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा क्रमांक ०३०६/२०२५ अंतर्गत कलम ५१ आणि ६३, कॉपीराइट कायदा १९५७ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

## राजकीय परिवर्तनासाठी बहुजन मुक्ती पार्टीचा कार्यकर्ता मेळावा उत्साहात पार पडला



**दै. आवाज वृत्तसेवा...**
सुरेश जगताप/बदलापूर : बहुजन मुक्ती पार्टीच्या वतीने राजकीय परिवर्तनासाठी कार्यकर्ता मेळावा हा भव्य कार्यक्रम काल दिनांक ९ नोव्हेंबर २०२५ रोजी बदलापूर (पूर्व) येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील छत्रपती शिवाजी महाराज उद्यान येथे अत्यंत उत्साहात पार पडला. या मेळाव्याचे उद्घाटन मा. वाय. आर. लोंढे (अध्यक्ष, चलो बुद्ध की ओर संघटना, बदलापूर) यांच्या हस्ते झाले. इंजी. रोशन वानखेडे (युवा अध्यक्ष, बीएमपी, बदलापूर शहर) यांनी मेळाव्याची प्रस्तावना मांडली, तर संघर्ष योद्धा मा. निलेशदादा येलवे (कार्याध्यक्ष, बहुजन मुक्ती पार्टी, महाराष्ट्र राज्य) यांनी अध्यक्षस्थानी राहून मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात वक्त्यांनी बहुजन समाजातील एससी, एसटी, ओबीसी, बीसी, एमबीसी, एनटी, डीएनटी, मराठा तसेच आदिवासी, धर्मपरिवर्तित मुस्लिम, ख्रिश्चन, बौद्ध, शिख, लिंगायत आदी सर्व घटकांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक उन्नतीसाठी बहुजन मुक्ती पार्टी करत असलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची माहिती दिली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या मेळाव्याचे विशेष महत्त्व असून, संघटनात्मक बळकटी वाढविण्यासाठी व कार्यकर्त्यांना एकत्र करून परिवर्तनाच्या लढ्याला दिशा देण्यासाठी हा मेळावा निर्णायक ठरला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन इंजी. रोशन वानखेडे यांनी केले तर आभार प्रदर्शन मा. निलेशदादा येलवे यांनी मानले. या वेळी बहुजन मुक्ती पार्टीचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला सदस्य, ज्येष्ठ नागरिक आणि युवा कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## घागरबुडा मुख्य रस्त्याची युवकांनी श्रमदानातून केली दुरुस्ती

**दै. आवाज वृत्तसेवा...**
लक्ष्मण पवार, हतगड. सुरगाणा तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत हतगड अंतर्गत घागरबुडा येण्या जाण्यासाठी असलेला मुख्य रस्त्याची अतिशय दयनीय अवस्था असुन या रस्त्यावर मोठ मोठाले खड्डे पडले होते.

यामुळे नागरिकांचे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने, आणि कुणी प्रशासन लक्ष देत नव्हते हे लक्षात घेता गावातील तरुण एकत्र येत अपघात टाळण्यासाठी खड्ड्यामध्ये दगडगोटे भरून रस्ता दुरुस्त केला. त्यावेळी यशवंत दळवी, हेमराज दळवी, विस्वास दळवी, राजु पवार, महाजन, धनराज दळवी, आदींनी पुढाकार घेत श्रमदान केले.



## डियाजियो इंडिया आणि नाशिक महानगरपालिकेने केला सामंजस्य करार

**दै. आवाज वृत्तसेवा...**
नाशिक: डियाजियो इंडिया (युनायटेड स्पिरिट्स लिमिटेड) आणि नाशिक महानगरपालिका (एनएमसी) यांनी २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यापूर्वी गोदावरी आणि नांदिनी नद्यांचे आरोग्य जपण्यासाठी तसेच नदी संवर्धन आणि घनकचरा व्यवस्थापन उपक्रमांना चालना देण्यासाठी सामंजस्य करार (एमओयू) केला आहे. हा करार नाशिक महानगरपालिका कार्यालयात झाला असून, यावेळी आयएएस स्मिता मनिषा खत्री (कमिशनर आणि ॲडमिनिस्ट्रेटर, नाशिक महानगरपालिका), आयएएस करिश्मा नायर (अतिरिक्त कमिशनर, नाशिक महानगरपालिका), अभय दाभोलकर (सिनियर जनरल मॅनेजर - मॅन्युफॅक्चरिंग, डियाजियो इंडिया) तसेच सीएसआरबॉक्सचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या कराराअंतर्गत डियाजियो इंडिया तर्फे तपोवन परिसरातील गोदावरी आणि नांदिनी नदीवरील दोन महत्त्वाच्या ठिकाणी 'बूम बॅरिअर' बसविण्याचे काम हाती घेतले जाणार आहे. या उपक्रमामुळे नदीत येणाऱ्या घनकचऱ्याचे प्रमाण कमी करण्यास मदत होईल आणि ही नदी स्वच्छतेच्या दिशेने एक महत्त्वाची पायरी ठरेल. हे प्रयत्न सिंहस्थ कुंभाच्या पार्श्वभूमीवर नाशिक महानगरपालिकेला कुंभमेळ्याच्या तयारीत मदत करतील. कुंभमेळ्याच्या काळात लाखो भाविक नाशिकला येतात, ज्यामुळे शहराच्या नागरी आणि पर्यावरणीय व्यवस्थेवर मोठा ताण येतो.

डियाजियो इंडियाचे कॉर्पोरेट रिलेशन्स डायरेक्टर देवाशीष दासगुप्ता म्हणाले, नाशिक महानगरपालिकेसोबतची ही भागीदारी आमच्या स्पिरिट ऑफ प्रोग्रेस या ईएसजी कृती योजनेशी आणि 'प्रिजर्व वॉटर फॉर लाइफ' या आमच्या संकल्पाशी घट्टपणे जोडलेली आहे. आम्ही सह-स्थापक असलेल्या द गोदावरी इनिशिएटिव्ह या उपक्रमाद्वारे नदी खोऱ्याचे आरोग्य सुधारण्यासाठी आणि पाण्याची गुणवत्ता वाढवण्यासाठी आणि पर्यावरणीय संतुलन मजबूत करण्यासाठी काम करत आहोत. 'बूम बॅरिअर' बसविणे हा या




प्रयत्नातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे आणि २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीत नाशिक महानगरपालिकेला सहकार्य करण्यासाठी आम्ही उत्साहित आहे.

सौ. मनिषा खत्री, आयएएस, कमिशनर आणि ॲडमिनिस्ट्रेटर, नाशिक महानगरपालिका म्हणाल्या, येणाऱ्या सिंहस्थ कुंभपूर्वी गोदावरी नदी प्रदूषणमुक्त करण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या द गोदावरी इनिशिएटिव्ह उपक्रमाअंतर्गत द फ्लोटिंग बॅरिअर्स प्रोजेक्ट मध्ये डियाजियो इंडियाचे स्वागत करताना आम्हाला आनंद होत आहे. ही भागीदारी स्वच्छ आणि निरोगी नदी परिसंस्थेच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. आम्ही डियाजियो इंडियासोबत पुढेही सहकार्य करण्यास उत्सुक आहोत आणि आपल्या नद्यांचे संरक्षण व पुनरुज्जीवन करण्यासाठी सर्वांना एकत्र येण्याचे आवाहन करतो.

ही भागीदारी डियाजियो इंडियाच्या स्पिरिट ऑफ प्रोग्रेस या ईएसजी कृती योजनेतील एक महत्त्वाचा टप्पा आहे, ज्यामध्ये 'प्रिजर्व वॉटर फॉर लाइफ' या उद्दिष्टावर भर देत जलसंवर्धन, हवामान बदलाशी जुळवून घेणे आणि समाजाच्या कल्याणावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. या वचनबद्धतेचा भाग म्हणून डियाजियो इंडिया देशभरातील विविध राज्यांमध्ये जलसंधारण, भूजल पुनर्भरण आणि निरंतर पाणी उपलब्धता यासाठी सातत्याने गुंतवणूक करत आहे..

या प्रयत्नांचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे द गोदावरी इनिशिएटिव्ह (टीजीआय) - हा एक अनोखा संयुक्त उपक्रम आहे, जो गोदावरी नदी खोऱ्याच्या आरोग्याशी संबंधित महत्त्वाच्या आव्हानांवर काम करण्यासाठी सुरू करण्यात आला आहे. डियाजियो इंडिया हा या उपक्रमाचा संस्थापक भागीदार असून, या उपक्रमाला प्रमुख कॉर्पोरेट संस्था, अलायन्स फॉर वॉटर स्टुअर्डशिप, सीएसआरबॉक्स आणि इतर संस्थांचे सहकार्य मिळाले आहे. टीजीआयचे उद्दिष्ट समुदायाच्या कल्याणासोबत पर्यावरणीय संतुलन आणि दीर्घकालीन जलसुरक्षा राखणारी सक्षम आणि समृद्ध नदी परिसंस्था निर्माण करणे आहे. गोदावरी नदी खोऱ्याचा सुमारे ५५३५० चौ. किमी क्षेत्र व्यापणाऱ्या या उपक्रमाचा लाभ महाराष्ट्रातील ९ जिल्ह्यांतील सुमारे २.३ कोटी लोकांना होणार आहे.

## पक्ष्याची गाथा ..

सगळीकडे सारखीचं
लहान पक्ष्याची गाथा
दाणे शोधत स्थिरला
इवल्या पक्षांचा जथा

हाकलून दिले तिकडे
धरला इकडचा रस्ता
संसारझकास मांडला
असा त्यांचा शिरस्ता

सन्मान देणारं आम्ही
अशा सा-याअस्वस्था
पुरवणारं सगळे लाड
सामावू घेता समस्ता

झालो आपण जोकर
पत्ते फिसता फिसता
निघूनजातात विजयी
आपण संपूर्ण फसता

साळसूद सोडती पक्ष
फायदे अन्यत्र दिसता
पुन्हा वाढवायले पक्षा
खात रहायच्या खस्ता
छोटेपक्ष जणूं पार्किंग
रे बड्यागाड्या करता
धुरळा उडवत परतती
रे रस्ता नव्याने धरता

- हेमंत मुसरीफ पुणे .

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद (८९९९९२१९९४). या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायकक्षेत) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ - ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# फार्मसीच्या विद्यार्थ्यांना औद्योगिक, हॉस्पिटल, क्लिनिकल, मार्केटिंगमध्ये मोठ्या संधी

## अमोल मोरे : एकलहरे येथील मातोश्री फार्मसी महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी : फार्मसीच्या पदवीनंतर करिअर करण्यासाठी अनेक दर्जेदार संधी उपलब्ध होत आहेत.विशेषता औद्योगिक फार्मसी, हॉस्पिटल फार्मसी, क्लिनिकल रिसर्च, मार्केटिंग आदी क्षेत्रातील संधी उपलब्ध होत असल्याने मुनमुक्तीच्या जोरावर आपल्या करिअरला आकार द्यावा असे आवाहन कोर ऍनालिटिकलचे संचालक अमोल मोरे यांनी केले. एकलहरे येथील मातोश्री कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात इंडक्शन कार्यक्रमात मार्गदर्शन करताना ते बोलत होते.नाशिक येथे प्रथम वर्ष डी.फार्मसी, प्रथम वर्ष बी. फार्मसी, प्रथम वर्ष फार्म. डी. व एम फर्मसीच्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम,करिअर संधी विषयी मार्गदर्शन करत स्वागत करण्यात आले.विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचा परिचय करून देणे,फार्मसी व्यवसायातील संधीं आणि विद्यार्थ्यांमध्ये प्रेरणा निर्माण करण्यासाठी आयोजन करण्यात आले होते. श्री. मोरे यांच्या हस्ते फीत कापून उद्घाटन करण्यात आले.प्राचार्य डॉ. पी. एस. मालपुरे यांनी विद्यार्थ्यांना फार्मसी क्षेत्रातील व्यावसायिक संधी व संशोधनाचे महत्त्व याबद्दल मार्गदर्शन केले.अतिथी कृष्णा कीर्तनदास यांनी स्ट्रेस मॅनेजमेंट याविषयावर अत्यंत उपयुक्त व्याख्यान दिले. त्यांनी तणाव कमी करण्याचे सोपे उपाय, वेळेचे नियोजन आणि सकारात्मक दृष्टीकोन कसा ठेवावा याबाबत मार्गदर्शन केले.या विषयावर आधारित पुस्तकाचे प्रदर्शन व चर्चा केली.यातून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण झाली. ग्रंथपाल स्वाती रुमणे,गायत्री गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील विविध संदर्भ ग्रंथ, ई-लायब्ररी व अध्ययन सुविधा दाखवून माहिती दिली.कार्यक्रमाचे समन्वयक मयुरी लांडगे, वर्षा चौधरी,अश्विनी शिरोळे,दीप्ती चौधरी,सौरभ अव्हाड आदींनी नियोजन केले.



## एकलहरे येथील मातोश्री आयुर्वेद महाविद्यालयात वंदे मातरमचे सामूहिक गायन



**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी : एकलहरे येथील मातोश्री आयुर्वेद महाविद्यालयात वंदे मातरम् गीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त सामूहिक गानाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व पूजनाने झाली.प्राचार्य डॉ.धीरज पाटील यांनी वंदे मातरम या गीताचे राष्ट्रीय आणि ऐतिहासिक महत्त्व स्पष्ट केले. हा सोहळा विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, एकता आणि संस्कार जोपासण्यास प्रेरणादायी ठरल्याचे त्यांनी सांगितले. सर्व विद्यार्थी, अध्यापकवर्ग व कर्मचारी यांच्या सहभागाने वंदे मातरम गीताचे सामूहिक गान करण्यात आले. गीताच्या सुरेल गजराने संपूर्ण परिसर देशभक्तीच्या भावनेने दुमदुमला.आयोजनात सांस्कृतिक समिती व विद्यार्थी कल्याण विभाग यांनी सक्रिय सहभाग घेतला.

## तरसाळी ग्रामपंचायतीच्या वतीने शेतकऱ्यांना हरभरा बियाण्याचे वाटप

**दै. आवाज वृत्तसेवा...**

तुषार रौंदळ, सटाणा प्रतिनिधी:- तरसाळी (ता.बागलाण) तरसाळी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून गावातील विविध विकासकामे करण्याबरोबरच गावातील ग्रामस्थ, मजुर व शेतकरी बांधवांना वयक्तीक योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी उपसरपंच लखन पवार यांचे सोबत सरपंच व सदस्य नेहमीच प्रयत्नशिल असतात, तरसाळी ग्रामपंचायतीच्या वतीने गावातील शेतकरी बांधवासाठी कृषी विभागाच्या माध्यमातून उपलब्ध केलेल्या ६५० किलो हरभरा बियाण्याचे वाटप आज बुधवार रोजी करण्यात आले, यावेळी सरपंच अर्चना



रौंदळ, उपसरपंच लखन पवार, सदस्य नामदेव बोरसे, काळु पिंपळसे, दिपक रौंदळ, निंबाबाई माळी, कमल गांगुर्डे, अनिता रौंदळ, ग्रामविकास अधिकारी प्रशांत आंबेकर, विजय रौंदळ, मोठाभाऊ बागुल, रामदास पवार, प्रभाकर रौंदळ, राजेंद्र मोहन, राजेंद्र रौंदळ, बारकु रौंदळ, अंबादास रौंदळ,भीमराव रौंदळ, अरुण मोहन,रवींद्र पवार, गोपीनाथ मोहन,बापू वाघ, साहेबराव रौंदळ, वजेसिंग पवार, रमेश चव्हाण, रोशन रौंदळ, विलास चव्हाण, सुमनबाई रौंदळ, वंदना चव्हाण आदिसह शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते..

# येवला मतदारसंघातील ३ कोटी २० लाख रुपयांच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण

**दै. आवाज वृत्तसेवा...**

येवला,निफाड,लासलगाव,दि.१२ नोव्हेंबर :- मंत्री छगन भुजबळ यांच्या माध्यमातून मतदारसंघात कोट्यवधी रुपयांची कामे सुरू आहे. नागरिकांना दिलेला शब्द कधीही पडू न देता सर्व कामे करण्यासाठी त्यांचे प्राधान्य आहे. रस्ते,पूल,तलाठी कार्यालय,सभामंडप यासह विविध कामे सुरू आहे. यापुढील काळातही राहिलेली कामे मार्गी लावली जातील. आवश्यक तो निधी उपलब्ध करून दिला जाईल. विकासकामांना निधी कमी पडू दिला जाणार नाही असे प्रतिपादन आमदार पंकज भुजबळ यांनी केले.

राज्याचे अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ व आमदार पंकज भुजबळ यांच्या विशेष प्रयत्नांतून मंजूर करण्यात आलेल्या विविध विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण आमदार पंकज भुजबळ यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष पंढरीनाथ थोरे, तालुकाध्यक्ष भाऊसाहेब भवर, लासलगाव बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर जगताप, मुंबई बाजार समितीचे संचालक जयदत्त होळकर, शिवाजी सुपनर, डॉ.श्रीकांत आवारे, तानाजी आंधळे, बाळासाहेब पुंड, दत्तूपंत डुकरे, दत्तात्रय रायते, सरपंच योगिता पाटील, उपसरपंच रामनाथ



शेजवळ, तुकाराम जाधव, सीमा दरेकर, अशोक नागरे, दीपक सोनवणे, बालेश जाधव, गुणवंत होळकर, संतोष पलोड, अजय ब्रह्मेचा, विलास गोरे, सचिन दरेकर, बबन शिंदे, अनिल सोनवणे, मधुकर गायकर, योगेश पाटील, मंगेश गवळी,केशव जाधव, अफजल शेख, डॉ. विकास चांदर, राजेंद्र जाधव, राजेंद्र चाफेकर, सोहेल मोमिन, इस्माईल मोमिन, सागर निकाळे, माधव जगताप, राहुल डुंबरे, तुकाराम गांगुर्डे, संतोष राजोळे, बापू लचके,मोहित बकरे, मोहन शेलार, विनायक चौधरी, अनिल रहाणे, मोहन जावळे, मोहसीन शेख, अरविंद टापसे, सुनील डचके, बाळासाहेब टापसे, अशोक क्षीरसागर,लतिफ तांबोळी, गंगाराम घोडे, परसराम घोडे, विठ्ठल खुटे,हिरामण घोडे, ओम राऊत यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी आमदार पंकज भुजबळ म्हणाले की, येवला मतदारसंघात दर्जेदार विकासकामे करण्यास प्राधान्य आहे. त्यामुळे नव्याने जी कामे सुरू करण्यात आली आहे.

ती दर्जेदार स्वरूपात व्हावी. यामध्ये स्थानिक नागरिकांनी देखील या कामाकडे विशेष लक्ष देऊन पूर्ण करून घ्यावीत. विकासाची प्रक्रिया ही न संपणारी प्रक्रिया आहे. नागरिकांकडून विविध मागण्या आहे. या सर्व मागण्या पूर्ण केल्या जातील असे त्यांनी सांगितले.

आमदार पंकज भुजबळ यांच्या हस्ते झाले या विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण

लासलगाव सर्व्हे नंबर ३४७ येथे स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत श्री स्वामी समर्थ मंदिर सभामंडप बांधणे कामाचे भूमिपूजन - र.रु. २० लाख

लासलगाव गणेशनगर येथे स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत संविधान भवन बांधणे कामाचे भूमिपूजन - र.रु.३० लाख

लासलगाव येथे स्थानिक विकास कार्यक्रम राधा नगर महिला जिम व सभामंडप भूमिपूजन करणे - र.रु.३० लाख

लासलगाव येथे स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत शिंपी गल्ली येथील श्री संत शिरोमणी नामदेव महाराज मंदिर परिसर सुधारणा व सुशोभिकरण करणे कामाचे भूमिपूजन - र.रु.१५ लाख

पिंपळगाव नजीक येथे स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत खंडेराव मंदिराजवळ सभामंडप बांधणे कामाचे भूमिपूजन - र.रु.२० लाख

पिंपळगाव नजीक येथे स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत ज्येष्ठ नागरिकांसाठी सभागृह बांधकाम करणे कामाचे भूमिपूजन - र.रु.२५ लाख

वनसगाव येथे स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत बुद्धविहाराजवळ पेव्हर ब्लॉक व कामे करणे कामाचे भूमिपूजन - र.रु.१० लाख

वनसगाव येथे स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत संत रोहिदास नगर मध्ये सामाजिक सभागृह बांधकाम करणे कामाचे भूमिपूजन - र.रु.१३ लाख

वनसगाव येथे स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत संत रोहिदास नगर मध्ये सभामंडप बांधकाम करणे कामाचे भूमिपूजन - र.रु.१२ लाख

विंचुर येथे अल्पसंख्यांक निधी अंतर्गत निफाड रोड इदगाह करीता संरक्षणभिंत आणि ओटा बांधकाम व अनुषंगिक कामे करणे कामाचे भूमिपूजन - र.रु.२० लाख

विंचूर येथे स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत वडार समाजासाठी ग्रामपंचायतीच्या मोकळया जागेवर सभामंडप बांधकाम करणे कामाचे भूमिपूजन - र.रु.२० लाख

विंचूर येथे पाताळेश्वर मंदिर रस्ता कॉंक्रिटीकरण करणे कामाचे लोकार्पण - र.रु.२० लाख

सुभाषनगर येथे स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत खंडेराव महाराज मंदिरा जवळ ग्रामपंचायतीच्या मोकळया जागेवर सभामंडप बांधकाम करणे कामाचे भूमिपूजन - र.रु.२० लाख

धारणगाव वीर येथे स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत सावता महाराज मंदिरासमोर सभामंडप बांधणे कामाचे भूमिपूजन - र.रु. ३० लाख

गोंदेगाव येथे स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत महादेव मंदिरा जवळ सभामंडप बांधकाम करणे कामाचे भूमिपूजन - र.रु.१५ लाख

भरवस येथे स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत महानुभव मंदिराजवळ सभागृह बांधणे कामाचे भूमिपूजन - र.रु.२० लाख

****

# कोल्हापूर जिल्ह्यातील महा-ई-सेवा केंद्र संघटनेचा कडकडीत बंद

## राज्यव्यापी बंद आंदोलनास कागलसह सर्वच जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै. आवाज वृत्तसेवा...**

जे.के.गोरंबेकर/कागल - राज्य शासनाने नव्याने अध्यादेश काढून नव्या आपले सरकार सेवा केंद्रांसाठी अर्ज मागवले असून त्या आदेशा विरुद्ध तसेच केलेल्या शासकीय कामांच्या कमिशनची रक्कम त्वरित द्यावी या प्रमुख मागण्यांसाठी संपूर्ण राज्यातील महा-ई-सेवाकेंद्र व आधार केंद्र संघटनेतर्फे आज पासून तीन दिवसांच्या राज्यव्यापी संपाचे आवाहन केले होते.आणि त्याच आवाहणांतर आज दिनांक - १२ नोव्हेंबर पासून आंदोलनाला कोल्हापुरसह संपूर्ण राज्यात सर्च सेवा केंद्र चालकांनी कडकडीत बंद करून प्रतिसाद दिला.

राज्यातील जवळपास शंभर टक्के सेवा केंद्र या संपात सहभागी झालेमुळे नागरिकांना मिळणाऱ्या डिजिटल शासकीय सेवांवर तात्पुरता परिणाम झाला आहे

संघटनेच्या मागण्यांमध्ये शासनमार्फत केलेल्या कामांचे कमिशन त्वरित देणे, नवीन सेवा केंद्रांना मंजुरी न देणे तसेच प्रत्येक केंद्र चालकास दरमहा पंधरा हजार रुपयांचे मानधन देणे या प्रमुख मागण्या आहेत.






## शिवसेना शेतकरी सेनेच्या जिल्हा अध्यक्षपदी अशोक पाटील तर कागल तालुका अध्यक्षपदी नवनाथ पाटील यांची निवड

**दै. आवाज वृत्तसेवा...**

जे.के. गोरंबेकर/ कागल - शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार शिवसेना शेतकरी सेनेच्या वतीने नुकत्याच नियुक्त्या जाहिर करण्यात आल्या असून, कोल्हापूर जिल्हा प्रमुख सुनिल शिंत्रे , जिल्हा प्रमुख संभाजी भोकरे, कागल तालुका प्रमुख जयसिंग टिकले. तालुकाप्रमुख शिवगोंडा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना शेतकरी सेनेचे नूतन जिल्हाध्यक्ष म्हणून शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे निष्ठावंत कार्यकर्ते मा.अशोक पाटील तसेच कागल तालुका अध्यक्ष नवनाथ पाटील यांची निवड करण्यात आली.



## राष्ट्रीय जल पुरस्कारांमध्ये महाराष्ट्र सर्वोत्कृष्ट राज्य; नवी मुंबई महापालिका स्थानिक स्वराज्य संस्था गटात प्रथम

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नवी दिल्ली, दि. ११ : केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाच्या जलसंसाधन, नदीविकास आणि गंगा संरक्षण विभागातर्फे जलसंरक्षण आणि जलव्यवस्थापनातील उत्कृष्ट कामगिरीला प्रोत्साहन देण्यासाठी देण्यात येणारे सहावे राष्ट्रीय जल पुरस्कार (२०२४) जाहीर करण्यात आले. सर्वोत्कृष्ट राज्य श्रेणीत महाराष्ट्राने प्रथम क्रमांक मिळवला असून, गुजरात दुसऱ्या तर हरियाणा तिसऱ्या क्रमांकावर आहे. स्थानिक स्वराज्य संस्था गटात नवी मुंबई महापालिकेने प्रथम पुरस्कार तर पाणी वापर संस्थामध्ये नाशिक जिल्ह्यातील कानिफनाथ संस्थेने द्वितीय क्रमांक पटकावला आहे.

## लंडन मधील ऐतिहासिक 'इंडिया हाऊस' महाराष्ट्र शासन ताब्यात घेणार - सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार



**दै. आवाज वृत्तसेवा...**

मुंबई : भारतीय स्वातंत्र्यसैनिकांचे वास्तव्य असलेले लंडनमधील इंडिया हाऊस महाराष्ट्र शासन ताब्यात घेऊन त्यास स्मारक म्हणून जतन करेल. या 'इंडिया हाऊस'मध्ये स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे वास्तव्य होते, अशी माहिती सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी दिली.

सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.शेलार हे नागपूरकरचे रघूजीराजे भोसले यांची ऐतिहासिक तलवार आणण्यासाठी लंडन दौऱ्यावर होते, तेव्हा त्यांनी इंडिया हाऊसला भेट दिली होती. त्यावेळी लंडनस्थित भारतीयांनी ही बाब त्यांच्या निदर्शनास आणून दिली होती. तसेच नाशिकच्या आमदार देवयानी फरांदे यांनीही ही मागणी केली होती. याबाबत आमदार देवयानी फरांदे, सामान्य प्रशासन, सांस्कृतिक कार्य, पुरातत्व विभागासह संबंधित विभागाचे अधिकारी यांच्या उपस्थितीत संयुक्त बैठक घेऊन आढावा घेण्यात आला. मित्राच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करून त्यात सामान्य प्रशासन विभाग, सांस्कृतिक कार्य विभाग, पुरातत्व विभाग आणि वित्त विभागाचा सहभाग असेल. ही समिती 'इंडिया हाऊस' ताब्यात घेण्याबाबतचा सर्वंकष अहवाल तयार करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सादर केल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

## शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा करावे : स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तहसीलदारांना निवेदन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

दिपक ढोकळे, पिंपळगाव लेप : प्रतिनिधी - येवला तहसील कार्यालयात येवला तालुक्याचे तहसीलदार आबा महाजन यांना स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने बुधवार दि.१२ नोव्हेंबर रोजी निवेदन देण्यात आले.परतीच्या पावसाने नुकसान झालेल्या अतिवृष्टीचे बाकी असलेल्या शेतकऱ्यांना शासकीय अनुदान लवकरात लवकर जमा करावा या मागणीचे लेखी स्वरुपात निवेदन देण्यात आले.निवेदनावर भाऊ जाधव दिगबर दौडे ज्ञानेश्वर बुले माणिकराव रसाळ रामनाथ दौंडे शांताराम सोनवणे प्रकाश सोनवणे गोकुळ जाधव अनिकेत पुंड उत्तम सोनवणे,सोनाजी वाळके,सुखदेव मोरे आदी शेतकऱ्यांच्या सह्या आहेत.



## संगमेश्वर येथे छत्रपती संभाजी महाराज स्मारक उभारणीसंदर्भात बैठक

### सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांना संकल्पचित्राचे सादरीकरण

**दै. आवाज वृत्तसेवा...**

मुंबई, दि. १२ : रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर येथे छत्रपती संभाजी महाराज स्मारक उभारण्याच्या अनुषंगाने या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील संकल्पचित्राचे सादरीकरण सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांच्याकडे करण्यात आले.

माजी आमदार प्रमोद जठार यांनी हे स्मारक वेगवेगळ्या टप्प्यात करून ते अधिक भव्यदिव्य व्हावे अशी मागणी केली होती. स्टॅच्यू ऑफ युनिटीच्या धर्तीवर स्मारक उभारावे, अशी सूचना केली होती. याबाबत संकल्पना समजून घेण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले.

सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.शेलार यांनी पहिल्या टप्प्यात संकल्पचित्रानुसार मुख्य स्मारकाचे काम करण्याचे निर्देश दिले. तसेच माजी आमदार प्रमोद जठार यांनी मांडलेल्या सूचनेनुसार आजूबाजूच्या परिसरात पर्यटकांसाठी सेवा, सुविधा व विकासाच्या कल्पनांचा अभ्यास करून सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. प्रस्तावित स्मारक ५ एकर क्षेत्रात उभारले जाणार असून, पार्किंग आणि अन्य सुविधांसाठी अतिरिक्त २ एकर जागा शासनाने घेतली आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

बैठकीला माजी आमदार प्रमोद जठार यांच्यासह सांस्कृतिक कार्य विभाग, पुरातत्व विभाग, रत्नागिरी जिल्हाधिकारी, तहसीलदार, सार्वजनिक बांधकाम विभाग व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## संविधान जनजागृती प्रश्नमंजुषा उपक्रम व्यापक स्वरुपात राबवावा - राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम

**दै. आवाज वृत्तसेवा...**

मुंबई दि.१२ : 'संविधान जनजागृती प्रश्नमंजुषा २०२५' उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शालेय जीवनापासूनच भारतीय संविधानाविषयी जागरूकता निर्माण होण्यास मदत होणार आहे. यासाठी सर्व संबंधित विभागांनी हा उपक्रम अधिक व्यापक स्वरुपात राबवावा, अशा सूचना महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांनी दिल्या.

'संविधान जनजागृती प्रश्नमंजुषा उपक्रम २०२५' ची आढावा बैठक महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाच्या कार्यालयात झाली. बैठकीस शिक्षण, सामाजिक न्याय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, आदिवासी, अल्पसंख्यांक विभागाचे अधिकारी उपस्थित होते. उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांनी सांगितले की, या स्पर्धेचे प्रारूप लवकरच तयार केले जाणार आहे. संबंधित विभागांनी या स्पर्धेची संपूर्ण पूर्वतयारी करावी. प्रत्येक शाळेतून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवण्यासाठी जनजागृती करावी. या स्पर्धेसाठी येणाऱ्या खर्चाची तरतूद शाळांना उपलब्ध करून दिलेल्या अनुदानातून करण्यात यावी.

शालेय शिक्षण विभागाने हा उपक्रम अधिक व्यापक प्रमाणात राबवण्यासाठी आवश्यक परवानगी त्यांच्या स्तरावर घ्यावी. याबाबत तातडीने कार्यवाही करून अहवाल कार्यालयास सादर करावा, असेही धर्मपाल मेश्राम यांनी सांगितले.

आदिवासी विकास विभागाने त्यांच्या अखत्यारित असलेल्या वसतिगृहात हा उपक्रम राबवण्याची संपूर्ण तयारी केली असल्याचे सांगितले. सामाजिक न्याय विभागानेही शासकीय निवासी शाळांमध्ये हा उपक्रम राबविण्यासाठी खर्चाची तरतूद केली जात असल्याचे सांगितले. इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत आश्रम शाळेमधील विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम राबविला जाणार असल्याचे सांगितले. अल्पसंख्यांक विभागामार्फत अल्पसंख्यांक विभाग योजनेचे लाभार्थी मुलांची वसतिगृह, शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी यांनाही उपक्रमात सहभागी करून घेतले जाईल असे सांगितले. प्रश्नमंजुषा उपक्रम www.yuvacareer.com या संकेतस्थळाद्वारे राबविण्यात येणार आहे.

## राष्ट्रीय जल पुरस्कारांमध्ये ...

(पान १ वरून) यावेळी जलशक्ती मंत्री पाटील यांनी सांगितले की, देशातील प्रत्येक स्तरावर जलसंरक्षण आणि जलसाक्षरतेला चालना देणे हा या पुरस्कारांचा मुख्य उद्देश आहे. 'जल समृद्ध भारत' ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी धोरणापासून ते वैयक्तिक प्रयत्नांपर्यंत सर्वांना ओळख देणे गरजेचे आहे. हे पुरस्कार पंतप्रधानांच्या 'कॅच द रेन', 'पर ड्रॉप मोअर क्रॉप' आणि 'अमृत सरोवर' योजनांशी जोडलेले असून, २०३० पर्यंत भारताला जलसंकटमुक्त करण्याच्या धोरणाला बळ देणारे ठरतील.